# पुणे विद्यापीठ

दूरध्वनी क्र.०२०—२५६०११८९
२५६०११९०
टेलीग्राफ : 'युनिपुना'
टेलेक्स : १४५ ७७१९ युनीप इन
फॅक्स नं. : ०२०—२५६९७३८८
संकेतस्थळ: www.unipune.ernet.in

गणेशखिंड,पुणे ४११००७

आरक्षण कक्ष
संदर्भ क्र. आरक्षण/२२/१७
दिनांक — ६/१/२०११

प्रति,
मा. प्राचार्य/मा. संचालक,
पुणे विद्यापीठ संलग्नीत सर्व महाविद्यालये/मान्यताप्राप्त संस्था.

विषय — महाविद्यालये/संस्थांमध्ये मागासवर्ग कक्ष स्थापन करणेबाबत.
संदर्भ — शासन पत्र क्र.बीसीसी २००४/१६६६/प्र.क्र.६१/०४/१६—ब, दि.१०/८/२००४
क्र.बीसीसी २०१०/प्र.क्र.४०९/१६—ब, दि.१६/८/२०१०

महोदय/महोदया,

उपरोक्त विषयास अनुसरून आपणास कळविण्यात येते की, शासकीय/निमशासकीय तसेच मंडळ/महामंडळे/नगरपालिका/महानगरपालिका/शासकीय उपक्रम, अनुदानित संस्था, विद्यापीठे, सहकारी संस्था, शैक्षणिक अनुदानित संस्था इत्यादींमध्ये ज्या कार्यालयामध्ये ५०० इतकी अधिकारी कर्मचारी वर्ग असेल अशा ठिकाणी मागासवर्ग कक्ष स्थापन करण्याबाबत शासनाने उपरोक्त शासन परिपत्रकान्वये आदेश दिलेले आहे. सोबत शासन परिपत्रक जोडत आहे. तरी उपरोक्त शासन परिपत्रकातील मार्गदर्शक सूचना विचारात घेवून आपल्या महाविद्यालये/संस्थांमध्ये मागासवर्ग कक्ष स्थापन करण्याबाबत कार्यवाही करावी, ही विनंती.

कळावे,

आपला विश्वासू,

सोबत — वरीलप्रमाणे

सही.कुलसचिव
(आरक्षण कक्ष)

शासकीय/निमशासकीय/मंडळे/महामंडळे/
नगरपालिका/महानगरपालिका इत्यादी कार्यालया-
मध्ये मागासवर्ग कक्ष स्थापन करण्याबाबत

# महाराष्ट्र शासन

सामान्य प्रशासन विभाग
शासन परिपत्रक क्र.बीसीसी-२००४/१६६६/प्र.क्र.६१/०४/१६-ब,
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२,
दिनांक : १० ऑगस्ट,२००४

पहा : शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग क्रमांक :- बीसीसी-१०८५/२९८८/
१६-ब, दिनांक १३ ऑगस्ट,१९८६.

**शासन परिपत्रक** :

मागासवर्गीयांच्या शासकीय सेवेतील आरक्षणाबाबतचे धोरण व शासकीय आदेशांची अंमलबजावणी योग्यरितीने होते किंवा नाही हे पहाण्यासाठी तसेच संबंधीत कार्यालयातील मागासवर्गीय अधिकारी/कर्मचारी यांच्या सेवाविषयक बाबींचे निराकरण करण्यासाठी वरील शासन निर्णयान्वये सामान्य प्रशासन विभागाच्या अधिपत्याखाली विभागीय आयुक्त स्तरावर मागासवर्ग कक्ष निर्माण करण्यात आले आहेत. तथापि सर्वच शासकीय/निमशासकीय तसेच मंडळे/महामंडळे/नगरपालिका/महानगरपालिका, शासकीय उपक्रम, अनुदानित संस्था, विद्यापिठे, सहकारी संस्था, शैक्षणिक अनुदानित संस्था इत्यादिमध्ये मागासवर्ग कक्ष स्थापन करण्याबाबतचे आदेश नाहीत. तथापि काही मोठ्या कार्यालयात मागासवर्ग कक्ष स्थापन केलेला आहे. त्यामुळे कार्यालयांमध्ये बिंदूनामावल्या ठेवणे व मागासवर्गीयांना आरक्षण विषयक लाभ व सवलती मिळण्यास मोलाचे सहकार्य मिळत असल्याचे आढळून आले आहे. ही बाब विचारात घेवून मोठ्या शासकीय/निमशासकीय कार्यालयांमध्ये खालील मार्गदर्शक सूचना विचारात घेवून मागासवर्ग कक्ष स्थापन करण्याबाबत कार्यवाही करावी.

१) ज्या कार्यालयांमध्ये १००० पेक्षा अधिक अधिकारी व कर्मचारीवृंद आहे, अशा कार्यालयांमध्ये, मागासवर्ग कक्ष स्थापन करावे.

२) ज्या कार्यालयामध्ये १००० पेक्षा अधिक अधिकारी/कर्मचारीवृंद नाही मात्र अशा कार्यालयांच्या अधिपत्याखाली क्षेत्रीय कार्यालये आहेत व अशा क्षेत्रीय कार्यालयातील कर्मचाऱ्यांच्या नियुक्त्याचे अधिकार क्षेत्रीय कार्यालयांना दिलेले असतील तर अशा क्षेत्रीय कार्यालयातील आरक्षण तपासणीकरीता संबंधीत विभागीय कार्यालयांमध्ये मागासवर्ग कक्ष स्थापन करावे.

३) सर्व विद्यापिठे, सर्व उपसंचालक/सहसंचालक (ज्यांना शिक्षक/शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या मान्यता देण्याचे अधिकार आहेत.) यांच्या कार्यालयामध्ये मागासवर्ग कक्ष स्थापन करावे.

४) या व्यतिरिक्त ज्या कार्यालयाला विधानमंडळाच्या अनुसूचित जाती/जमाती/ वि.जा.भ.ज./ इ.मा.व.कल्याण समितीने विशेष करुन (specifically) आदेश दिलेले असतील अशा कार्यालयांमध्ये मागासवर्ग कक्ष स्थापन करावे.

रोटा प्रिंट/एच–586(5000–8–04)1

(कृ.मा.प.

५)	सदर मागासवर्ग कक्षाकरीता नेमावयाच्या अधिकारी व कर्मचारी वर्गाची संख्या ही त्या कार्यालयाच्या एकूण अधिकारी/कर्मचारी वर्गाची संख्या, त्या कार्यालयाच्या अधिपत्याखालील क्षेत्रीय कार्यालयातील अधिकारी/कर्मचाऱ्यांची संख्या व त्या कार्यालयांच्या कार्यक्षेत्राखाली येणाऱ्या कार्यालये/शैक्षणिक संस्था विचारात घेवून तसेच स्थापन करावयाच्या मागासवर्ग कक्षाचे कामकाज विचारात घेवून निश्चित करावयाची आहे.

६)	असा निश्चित केलेला अधिकारी/कर्मचारीवृंद स्वतंत्रपणे पदे निर्माण करुन किंवा सद्या कार्यरत असलेल्या अधिकारी/कर्मचाऱ्यामधून मागासवर्ग कक्षाला उपलब्ध करुन देण्याबाबत प्रशासकीय विभागाने वा संबंधीत कार्यालयाने निर्णय घ्यावा.

२.	मंत्रालयीन विभागांनी त्यांच्या प्रशासकीय नियंत्रणाखालील सर्व शासकीय/निमशासकीय इत्यादी कार्यालयांना या परिपत्रकानुसार योग्य त्या सूचना विनाविलंब निर्गमित करण्यात याव्यात व त्याची एक प्रत या विभागाकडे पाठवावी.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,

कुमावत

( दे.त्र्यं.कुमावत )
**उप सचिव,महाराष्ट्र शासन**

प्रति,

मा.राज्यपाल यांचे सचिव,
मा.मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव,
मा.उप मुख्यमंत्र्यांचे सचिव,
सर्व मंत्री/राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव,
मुख्य सचिव/अपर मुख्य सचिव/प्रधान सचिव/सचिव,मंत्रालयीन विभाग,
सर्व मंत्रालयीन विभाग (आस्थापना शाखा),
सर्व विभागीय आयुक्त,
सर्व जिल्हाधिकारी,
प्रधान सचिव, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, मुंबई,
सर्व जिल्हा परिषदांचे मुख्य कार्यकारी अधिकारी,
* प्रबंधक, उच्च न्यायालय, मूळ शाखा, मुंबई,
* प्रबंधक, उच्च न्यायालय,अपील शाखा, मुंबई,
* प्रबंधक, लोकायुक्त आणि उप लोकायुक्त यांचे कार्यालय, मुंबई,
* सचिव, महाराष्ट्र लोकसेवा आयोग, मुंबई,
आयुक्त, आदिवासी विकास, नाशिक,
संचालक, समाज कल्याण, पुणे,
सहायक आयुक्त (मागासवर्ग कक्ष), सर्व विभागीय आयुक्तांची कार्यालये,
सर्व मंत्रालयीन विभागाच्या अधिपत्याखालील विभाग प्रमुख व कार्यालय प्रमुख,
सामान्य प्रशासन विभागातील सर्व कार्यासने,
निवड नस्ती,

*	पत्राने.

एच–586(5000–8–04)1अ.

शासकीय/निमशासकीय/मंडळे/महामंडळे/
नगरपालिका/महानगरपालिका इत्यादी
कार्यालयांमध्ये मागासवर्ग कक्ष स्थापन
करण्याबाबत.

मा. कुलसचिव कार्यालय
पुणे विद्यापीठ, पुणे-७.
आवक क्र.-आर/ ३८९९
दिनांक - ०८/१२/१०
जावक दिनांक - ०८.१२.१०
विभाग - आरक्षण

UNIVERSITY OF PUNE
(General Section)
7 DEC 2010
Inward No. ९९८८

आवक क्र. 2701
दिनांक 9.12.10
(आरक्षण कक्ष)

महाराष्ट्र शासन
सामान्य प्रशासन विभाग
शासन परिपत्रक क्र.बीसीसी-२०१०/प्र.क्र.४०९/१६-ब
मंत्रालय,मुंबई ४०० ०३२
दिनांक : १६ ऑगस्ट, २०१०.

वाचा : शासन परिपत्रक क्र.बीसीसी २००४/१६६६/प्र.क्र.६१/०४/१६-ब,
दिनांक १० ऑगस्ट, २००४.

प्रस्तावना : शासन परिपत्रक क्र.बीसीसी २००४/१६६६/प्र.क्र.६१/०४/१६-ब, दिनांक १० ऑगस्ट. २००४ नुसार शासकीय/निमशासकीय तसेच मंडळे/महामंडळे/नगरपालिका/महानगर पालिका/ शासकीय उपक्रम, अनुदानित संस्था, विद्यापीठे, सहकारी संस्था, शैक्षणिक अनुदानित संस्था इत्यादींमध्ये ज्या कार्यालयांमध्ये १००० पेक्षा अधिक अधिकारी व कर्मचारी वृंद आहे अशा कार्यालयांमध्ये मागासवर्ग कक्ष स्थापन करण्यात यावा असे आदेश शासनाने दिले आहेत.

या संदर्भात अध्यक्ष, अनुसूचित जमाती कल्याण समिती, महाराष्ट्र विधानमंडळ, मुंबई यांच्याकडे दिनांक ४ जून, २०१० रोजी झालेल्या सचिवांच्या साक्षीच्या वेळी त्यांनी सदर आदेशातील १००० इतक्या अधिकारी व कर्मचारी वृंदाच्या मर्यादेत सुधारणा करुन ती संख्या कमी करणे आवश्यक असल्याचे मत व्यक्त केले.

शासन परिपत्रक : उपरोक्त बाबत विचार करुन शासन आता असे आदेश देत आहे की, ज्या कार्यालयांमध्ये ५०० पेक्षा अधिक अधिकारी व कर्मचारी वृंद आहे, अशा कार्यालयांमध्ये मागासवर्ग कक्ष स्थापन करावा.

२. शासन परिपत्रक, दिनांक १०.८.२००४ मधील क्रमांक २ पुढे दिलेल्या आदेशामध्ये या अनुषंगाने १००० च्या ऐवजी ५०० इतकी अधिकारी व कर्मचारी वृंदाची मर्यादा राहील. शासन परिपत्रक, दिनांक १०.८.२००४ मधील अन्य आदेश जसे आहेत तसे लागू रहातील.

३. मंत्रालयीन विभागांनी त्यांच्या प्रशासकीय नियंत्रणाखालील सर्व शासकीय/ निमशासकीय, मंडळे/महामंडळे, शासकीय उपक्रम इत्यादी कार्यालयांना या परिपत्रकानुसार

योग्य त्या सूचना निर्गमित कराव्यात व यानुसार कार्यवाही करण्यात आली आहे याची खातरजमा करावी.

४. सदर शासन परिपत्रक महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या वेबसाईटवर उपलब्ध करण्यात आले असून त्याचा संगणक सांकेतांक २०१००८१६१८४३४२००१ असा आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

( दि. ग. डिंगळे )
अवर सचिव,महाराष्ट्र शासन

प्रति,
सर्व विधानसभा व विधान परिषद सदस्य,
मा.राज्यपाल यांचे सचिव,
मा. मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव,
मा. उप मुख्यमंत्र्यांचे सचिव,
सर्व मंत्री/राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव,
मुख्य सचिव/अपर मुख्य सचिव/प्रधान सचिव/सचिव, मंत्रालयीन विभाग,
सर्व मंत्रालयीन विभाग (आस्थापना शाखा),
महासंचालक, माहिती व जनसंपर्क संचालनालय,मंत्रालय,मुंबई
सर्व विभागीय आयुक्त,
सर्व जिल्हाधिकारी,
प्रधान सचिव, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, मुंबई,
सर्व जिल्हा परिषदांचे मुख्य कार्यकारी अधिकारी,
* प्रबंधक, उच्च न्यायालय, मूळ शाखा, मुंबई,
* प्रबंधक, उच्च न्यायालय, अपील शाखा, मुंबई,
* प्रबंधक, लोकायुक्त आणि उप लोकायुक्त यांचे कार्यालय, मुंबई,
सचिव, महाराष्ट्र लोकसेवा आयोग, मुंबई
आयुक्त, आदिवासी विकास, नाशिक,
संचालक, समाज कल्याण, पुणे,
सदस्य सचिव, अनुसूचित जाती व जमाती आयोग, १ला मजला,प्रशासकीय इमारत (डेअरी विभाग), अब्दुल गफारखान मार्ग, वरळी सी फेस, मुंबई ४०० ०१८,
सहायक आयुक्त (मागासवर्ग कक्ष), सर्व विभागीय आयुक्तांची कार्यालये,
सर्व मंत्रालयीन विभागाच्या अधिपत्याखालील विभाग प्रमुख व कार्यालय प्रमुख,
सामान्य प्रशासन विभागातील सर्व कार्यासने,
ग्रंथपाल, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय,मुंबई,
निवड नस्ती,
* पत्राने.

-------